# नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय :-** सेवानिवृत्त संचालक, नगर रचना यांची करार पध्दतीने सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याबाबत..

**विभागाची आवश्यकता :**

नगर रचना विषयक कामकाज तसेच मंत्रालयस्तरावर नगर विकास विभागातील कामकाजाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त संचालक, नगर रचना (१ पद) यांची नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने प्रथमतः एक वर्षाच्या कालावधीकरीता नियुक्ती करावयाची आहे.

**कामाचे स्वरूप :-**

I. Maharashtra Regional and Town Planning Act, १९६६ (MRTP) व Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) या कायद्यांच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेत सुव्यवस्था आणण्याच्या अनुषंगाने तसेच प्रक्रिया संगणकीकृत करण्यास्तव सूचना करणे.

II. उक्त कायद्यांमध्ये आवश्यक सुधारणांच्या अनुषंगाने सूचना देणे.

III. नगर रचना योजनासंबंधी सल्ला देणे व सदरील योजनांचे संगणकीकरणाच्या अनुषंगाने सूचना करणे

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेले संचालक, नगर रचना हे पद धारण करणारे अधिकारी असावेत.

३) क्षेत्रियस्तरावरील तसेच मंत्रालयस्तरावरील नगर रचना विषयक कामकाजाचा अनुभव असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

७) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज **दि. २७ मार्च, २०२६** रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत "सह सचिव (आस्थापना), दालन क्र.४०१ मुख्य इमारत (सचिवांची दालने), ४ था मजला, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२" या पत्त्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीशः आणून द्यावा. सदर अर्ज जाहिरातीच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत सादर करावा..

या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२८५४५७३/०२२-२२८२०४५५ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार नगर विकास विभागाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास नेमून दिलेल्या ठिकाणी काम करावे लागेल.

११) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १० जून, २०२५च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

****************